जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५१४ दिनांक - ०९/०७/२०२३**

## पीसीबी,गुन्हे शाखा,पुणे शहर अंतर्गत एमपीडीए कारवाई

## दत्तवाडी पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये २८ वी स्थानबध्दतेची कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील दत्तवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार **नामे समीर राहुल हतांगळे वय २२ वर्ष,रा.स.नं.१३२,महालक्ष्मी बिल्डींग,दांडेकर पुल,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे.त्याने त्याच्या साथीदारांसह दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत लोखंडी रॉड, धारदार हत्यार, या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह **खुनाचा प्रयत्न,बेकायदेशीर हत्यार बाळगणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०३ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार,यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.जयराम पायगुडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे व श्रीमती वैशाली चांदगुडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी. गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणाऱ्या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही २८ वी कारवाई असून,** यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.